# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in


जा क्र.तंशिविकापु/विवि/डीबीटी/२०१९/2042 दिनांक :- 31 MAY 2019

प्रति,

प्राचार्य/संचालक,

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील

पुणे विभागातील सर्व संस्था,

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील महाडीबीटी पोर्टलमार्फत शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत व लाभ जलद गतीने प्राप्त होण्यासाठी संस्थांना प्रशिक्षण..

संदर्भ :- १) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता विविध योजनांतर्गत महाडीबीटी पोर्टलवर भरलेले व मंजूर करण्यात आलेले अर्ज.

२) संचालक,तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे दिनांक १५/०५/२०१९ चे पत्र

उपरोक्त विषय व संदर्भानुसार २०१८-१९ मध्ये महाडीबीटी पोर्टलमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध शिष्यवृत्ती योजनांचे लाभ जलद गतीने प्राप्त होण्यासाठी पुणे विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व तंत्रशिक्षण संस्थामधील उपरोक्त शिष्यवृत्ती योजनांचे काम पहाणारे अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी १ दिवसाचे प्रशिक्षण दिनांक ४ जून २०१९ रोजी सकाळी ११:०० वाजता शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,पुणे येथील मुख्य ऑडीटोरीअम येथे आयोजित करण्यात आलेले आहे. सदर प्रशिक्षणासाठी महाऑनलाईनचे प्रतिनिधी उपस्थित राहून संस्था तसेच शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांचे लाभ देणारे विभाग ( जसे की, समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग ) यांचे संबधीत अधिकारी यांना विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिष्यवृत्ती मंजूरीनंतर संस्थांसाठी येत असलेल्या तांत्रिक अडचणी व इतर अडचणी समजून घेऊन त्यांचे शक्य तितक्या लवकर निवारण करणार आहेत. संस्थांना विद्यार्थ्यांचे अर्ज मंजुरीनंतर शिष्यवृत्ती योजनांचे लाभ मिळण्यामध्ये येणा-या योजनांनिहाय तांत्रिक अडचणी संस्थेच्या लॉगीनमधून दिनांक १ जून २०१९ पर्यत सविस्तरपणे नमूद कराव्यात जेणेकरुन प्रशिक्षणाच्या दिवशी त्यांचे निवारण केले जाईल.

प्र. सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :-

१. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई (कार्यासन क्र १८) यांना माहितीसाठी सादर
२. मा.व्यवस्थापक,महाऑनलाईन लिमीटेड,पाचवा मजला, ट्रेड वर्ल्ड,डी विंग कमला सिटी, सेनापती बापट रोड, लोअर परेल मुंबई- ४०० ०१३ यांना विनंती करण्यात येते की दिनांक ४ जून २०१९ रोजी प्रशिक्षण देण्यासाठी त्यांचे प्रतिनिधीची प्रतिनियुक्ती करावी.
३. मा.आयुक्त समाज कल्याण आयुक्तालय, म.रा.३ चर्च रोड, पुणे.४११ ००१
४. मा.संचालक विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, ३ चर्च रोड पुणे- ४११ ००१
५. प्रकल्प अधिकारी आदिवासी प्रकल्प विभाग घोडेगाव जि.पुणे
६. प्रकल्प अधिकारी आदिवासी प्रकल्प विभाग सोलापूर,

**उपरोक्त क्र ३ ते ६ यांना विनंती करण्यात येते की, सदर प्रशिक्षणासाठी त्यांचे कार्यालयातील संबंधीत अधिकारी/कर्मचारी त्यांना येत असलेल्या तांत्रिक अडचणीच्या माहितीसह पाठविण्यात यावे.**